International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# मोहोळ तालुक्याचे लोकप्रतिनिधी गोविंद भाऊराव बुरकुटे यांचे कार्य

डॉ.सज्जन उद्धव पवार
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज
*Corresponding Author-* डॉ.सज्जन उद्धव पवार
Email- sajjanpawar1981@gmail.com
*DOI- 10.5281/zenodo.7070986*

**प्रस्तावना**

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक लोकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. या स्वातंत्र्यसेनानी पैकीच एक म्हणजे मोहोळ तालुक्याचे तिसरे आमदार श्री गोविंद भाऊसाहेब बुरगुटे होय. सन 1967 च्या विधानसभा निवडणुकीत श्री.गोविंद बाबुराव मुरकुटे मोहोळ तालुक्याचे आमदार झाले. त्यांचा जन्म 5 ऑगस्ट 1923 रोजी झाला.[1] त्यांचे मूळ गाव बार्शी तालुक्यातील उपळे (दुमाला) गाव आहे. त्यांनी अनेक प्रकारच्या अडचणीवर मात करून, खडतर जीवनातील समस्यावर उपाय शोधून बी. एल. एल. बी पर्यंत शिक्षण घेतले. मा.गोविंद बुरगुटे यांनी शिक्षण पूर्ण झालेनंतर स्वातंत्र्य चळवळीमध्ये कार्य केले. त्यानंतर त्यांनी राजकीय क्षेत्रामध्ये सहभाग घेऊन विविध लोककल्याणकारी कामे केली. त्यांचा कार्याचा आढावा या शोधनिबंधात घेण्यात आला आहे. गोविंदरावांनी इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेऊन लोकजागृतीसाठी अनेक ठिकाणी सभा घेतल्या. ब्रिटिश सरकारविरोधी घोषणा दिल्या. भारतमातेला स्वतंत्र करण्यासाठी अनेक तरुणांना एकत्रित आणून इंग्रजा विरोधी काम केले. यामुळे गोविंदरावांना कारावासाची शिक्षा झाली. कारावासाची शिक्षा संपल्यानंतर गोविंदरावांनी काही काळ शेतकरी कामगार पक्षाचे कार्य केले. गोविंदराव शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक सदस्य होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी, त्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने काम केले.

इ. स. 1960 नंतर ते काँग्रेस पक्षात कार्यरत झाले. काँग्रेस पक्षाचे कार्य करण्यासाठी नव्या जोमाने, उमेदीने गोविंदराव आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेतले पाहिजे व स्वतःची उन्नती केली पाहिजे म्हणून शिक्षण संस्था उभारली. विद्यार्थ्यांना घरची परिस्थिती चांगली नसल्याने शिक्षण घेता येत नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन स्वतःची प्रगती करावी, म्हणून विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था व्हावी यासाठी त्यांनी वसतिगृहे सुरू केले.[2] यातून शिक्षणाचा झालेला प्रसार, त्यांच्या सामाजिक कार्याचा महत्त्वाचा भाग आहे. त्यांच्या शिक्षण कार्यामुळे भावी पिढी निर्माण झाली. या पिढीने सामाजिक विकास साधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

शिक्षण संस्था वसतिगृह स्थापन करून गोविंदराव न थांबता समाजातील सर्वसामान्य घटकांना सोयीसुविधा मिळाव्यात, या सुविधा सर्वांनी एकत्रित येऊन कराव्यात यासाठी त्यांनी ग्रामीण भागात सहकार चळवळीत महत्त्वाचे कार्य केले. ही सहकार चळवळ पूर्ण ग्रामीण भागात प्रसारित व्हावी यासाठी पुरेपूर प्रयत्न केले. त्यामध्ये त्यांचा सध्याच्या मोहोळ-वैराग मतदारसंघातील बार्शी तालुक्यातील वैराग येथील भोगावती सहकारी साखर कारखाना उभारणीत सिंहाचा वाटा होता. समाजहिताची काळजी करणाऱ्या नेत्याला काँग्रेस पक्षाने विधानसभेचे तिकीट दिले व ते प्रथम उत्तर सोलापूर या विधानसभा मतदारसंघातून सन 1962 मध्ये निवडून आले.[3] प्रथम निवडून आल्यामुळे त्यांनी जोमाने कार्य केले. सामाजिक, राजकीय, आर्थिक, सहकारी चळवळीत कार्य करीत गोविंदरावांनी समाजाचे विकासाभिमुख नेतृत्व करून जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले. त्यानंतर सन 1967 च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने त्यांना

मोहोळ-वैराग विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली. काँग्रेस पक्ष व सामाजिक कार्याच्या आधारे सन 1967 मध्ये मोहोळ तालुक्याचे आमदार म्हणून निवडून आले.[4] सन 1967 च्या मोहोळ तालुका विधानसभा निवडणुकीत त्यांना 19,523 मते मिळाली, तर त्यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार डी. एम.कादे यांचा 2930 मतांनी पराभव करून ते मोहोळ तालुक्याचे लोकप्रतिनिधी झाले.[5]

मा.आ. गोविंद भाऊराव मुरकुटे यांनी मोहोळचे आमदार झाल्यानंतर पूर्वीपेक्षा जास्त जोमाने काम केले. त्यांनी जनविकासास प्राधान्य दिले.त्यासाठी त्यांनी जनतेच्या प्रश्नांना शासन दरबारी वाचा फोडून, जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळावा यासाठी प्रयत्न केले. त्याचबरोबर मोहोळ तालुक्याचा विकास व्हावा म्हणून त्यांनी मोहोळ तालुक्याचे विविध प्रश्न महाराष्ट्र विधानसभेत मांडले. त्यांनी तालुक्याच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मंत्रिमहोदयांना दखल घेण्यास भाग पाडले. अशा पद्धतीने त्यांनी आमदार म्हणून मोहोळ तालुक्याचा विकास घडवून आणण्यात महत्त्वाचे योगदान दिले.

त्यांच्या आमदारकीच्या कारकिर्दीत आष्टी ग्रामपंचायतच्या अधिपत्याखालील काही वाड्यांचा समावेश होता. या वाड्यांना स्वतंत्रपणे कारभार करण्याची संधी मिळावी म्हणून त्यांनी वाड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतचा दर्जा देण्याची मागणी केली. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री मा.वसंतराव नाईक यांनी आष्टीच्या ग्रामपंचायतच्या अधिपत्याखालील दोन्ही वाड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतचा दर्जा देण्याची मागणी मान्य केली.[6] त्या काळात सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी असलेल्या उजनी धरणाचे बांधकाम सुरू होते.हे बांधकाम अत्यंत सावकाश गतीने सुरू होते. त्याबाबत मा.आ. गोविंदराव बुरकुटे यांनी शासनाकडे खुलासा मागितला. त्यावेळी तत्कालीन पाटबंधारे मंत्री यांनी धरणाच्या कामास गती आणण्यासाठी तीन विभाग स्थापन केले. धरण व कालव्याच्या कामाची कंत्राटे अनेकांना देण्यास सुरुवात केली आणि धरणाच्या कामांमध्ये गती आणली.[7] यामध्ये गोविंदराव बुरकुटे यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये दारूबंदी कायदा लागू असताना अनेक गावांमध्ये दारू बंदी कायद्याचा भंग करून सर्रास गावात राजरोसपणे दारू विक्री चालत असे. याबाबत मोहोळ लोकप्रतिनिधी गोविंद बुरकुटे यांनी दारूबंदी कायद्याच्याअंमलबजावणीसाठी उपायोजना करण्याची मागणी केली त्यामुळे शासनाने दारूबंदीची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी म्हणून स्वतंत्र कार्यबल नियुक्ती केले. गुन्हेगाराच्या हालचालीवर लक्ष ठेवून दारू पिणाऱ्या, विकाणाऱ्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे आश्वासन तत्कालीन मंत्री मा.भा. मं. याज्ञीक यांनी देऊन त्यादृष्टीने प्रयत्न केले.[8] अशा प्रकारे शेती, पाणीपुरवठा, सामाजिक शांतता राखण्याच्या दृष्टीने कायद्याची अंमलबजावणी करणे असे अनेक प्रश्न महाराष्ट्र विधानसभेत मा. बुरगुटे यांनी मानले. त्यांनी अशा विविध प्रश्नांची सोडवणूक करून जिल्ह्याबरोबरच मोहोळ तालुका विकासाला गती देण्याचा प्रयत्न केला.

गोविंद भाऊराव बुरगुटे यांचे कार्य मोहोळ तालुक्याच्या विकासाचा पाया रचण्याचे कार्य होते.त्यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक कार्यावर भर दिला. त्यांनी महाराष्ट्र विधानसभेत सोलापूर जिल्हाबरोबर मोहोळ तालुक्याचे प्रश्न वरीलप्रमाणे मांडून जिल्ह्याबरोबरच मोहोळ तालुक्याचा विकास करून घेतला आहे. समाजाचा विकास करण्याचा वसा घेतलेल्या थोर नेत्यांची 7 डिसेंबर 2001 रोजी दुःखद निधन झाले. गोविंद बाबुराव बुरकुटे यांच्या निधनाबद्दल महाराष्ट्र विधानमंडळात दि. 11 डिसेंबर 2001 रोजी शोकप्रस्ताव मांडला. यावेळी विधानसभा अध्यक्ष मा. श्री अरुणलाल गोवर्धनदास गुजराथी होते.[9] त्यावेळी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. विलासराव देशमुख यांनी विधानसभेत शोक व्यक्त करून गोविंद बाबुराव बुरकुटे यांच्या सभागृहातील आठवणींना उजाळा दिला. त्याचबरोबर मा. श्री. गोपीनाथ मुंडे, मा. श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा. श्री. हर्षवर्धन पाटील व मोहोळ तालुक्याचे तत्कालीन आमदार राजन पाटील यांनी गोविंद बूरकुटे यांना श्रद्धांजली वाहून दुःख व्यक्त केले.[10]

मा.आ.गोविंद बुरकुटे यांचे लोकहितदक्ष, समाजहितदक्ष आणि स्वातंत्र्य आंदोलनातील कार्य मोहोळच्या विकासात महत्त्वाचे आहे. मोहोळ तालुका विकासाच्या पायाभरणीमध्ये त्यांचे कार्य अनमोल

असून त्यावरच नंतरच्या काळात मोहोळ तालुक्याचे प्रगती घडून आली आहे.

**संदर्भ साधने**

1.महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही, अधिकृत प्रतिवेदन, खंड-126, मंगळवार, दि.11 डिसेंबर 2001, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2001, (शोकप्रस्ताव), पृ. 7/88.

2.कित्ता, पृ.7/88.

3.मुलाखत, चवरे प्रकाश, मा. सरपंच, पेनुर, ता.मोहोळ, दि.07/07/2014, सकाळी 11 वा.

4. सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्राचे वैभवशाली मोहोळ तालुका, मे 2010, पृ.6.

5.Statistical Report on General Election,1967 to the Legistative Assembly, Election Commission of India,New Delhi,State Election 1967,to the Legislative Assembly of Maharashtra, Constituency Data Summary,page No.220.

6.महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही, अधिकृत प्रतिवेदन, खंड-27, मंगळवार दि.22 जुलै 1969, महाराष्ट्र शासन, मुंबई, सन 1970, पृ.1313.

7.महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही, शासकीय प्रतिवेदन, खंड-30, बुधवार दि. 15 ऑगस्ट 1970, क्रमांक-3, महाराष्ट्र शासन, मुंबई, सन 1971, पृ.129.

8.महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही( शासकीय प्रतिवेदन), खंड- 29, सोमवार दि. 4 मे 1970, क्रमांक-40, महाराष्ट्र शासन, मुंबई, सन-1970, पृ.2108.

9.www.maharashtra legislature Mumbai, Legislative bodies in Indian.in.Date 22-02-2013.

10.उपरोक्त, महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही, अधिकृत प्रतिवेदन, सोमवार, दि.11 डिसेंबर 2001, (शोकप्रस्ताव), पृ.7/88, 7/89.